सुवर्णसंधी सभासद अभियान
वाढदिवस तुमचा, शुभेच्छा आमच्या...
सा.प्रगत भारत वृत्तपत्रकाचेआजच सभासद व्हा..मो.नं.९८६०८७७७८९

साप्ताहिक
# प्रगत भारत
..वर्ष १९ वे
Web:www.pragatbharat.com,youtube-pragatbhart,,mo.9860877789




• वर्ष:१९ • अंक क्र.०४ • साप्ताहिक • मंगळवार दि.१४ ते २० जुलै २०२६ • RNI/MAH/MRA/2008/25149 • RNP/पोस्ट-PCE/006/2024-2026 • पृष्ठे-४ • किंमत:२.००

## मोशी येथील कचरा डेपो दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबांना जास्तीत जास्त मदत द्या;आयुक्तांना निवेदन

विविध विभागाच्या ताज्या बातम्या पहा.
www.pragatbhart.com
संपर्क मो-९८६०८७७७८९



**पिंपरी:-मोशी येथील कचरा डेपो परिसरात अतिवृष्टीमुळे लँडफिलचा काही भाग खचून वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्पाच्या प्रशासकीय इमारतीवर कोसळल्याने झालेल्या भीषण दुर्घटनेत मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना जास्तीत जास्त आर्थिक नुकसानभरपाई,कायमस्वरूपी रोजगार, घर, मुलांच्या शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी घ्यावी,अशी मागणी भाजपाचे माजी नगरसेवक विकास डोळस यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.**

यावेळी भाजपा शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न काटे,सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे,स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, क्रीडा व सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे, नगरसेवक राहुल कलाटे,धर्मपाल तंतरपाळे,आरपीआयचे गटनेते कुणाल वाव्हळकर,योगेश लांडगे, कुंदन गायकवाड, प्रा. उत्तम केंदळे, सचिन तापकीर,सागर गवळी,नवनाथ जगताप, शितल शिंदे,बापू घोलप, सागर आंघोळकर आणि सचिन सानप उपस्थित होते.निवेदनात म्हटले आहे की, मोशी येथील दुर्घटना ही केवळ औद्योगिक अपघात नसून अनेक कुटुंबांवर कोसळलेले मोठे सामाजिक संकट आहे. या दुर्घटनेत ९ कुटुंबांचा कर्ता व्यक्ती गमावला असून त्यांच्या कुटुंबांचे उत्पन्नाचे साधन एका क्षणात संपुष्टात आले आहे. त्यामुळे केवळ शोक व्यक्त करणे किंवा मर्यादित आर्थिक मदत जाहीर करणे पुरेसे ठरणार नाही. तर, महानगरपालिका, **(पान २ वर)**

## उपवर्गीकरणविरोधातील महामोर्चा यशस्वी

### चर्मकार समाजाच्या विविध संघटना व भारतीय बौध्द महासभा व समता सैनिक दलाचा सक्रिय सहभाग..

### सरकार मागासर्गीयांवर अन्याय होऊ देणार नाही:उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे शिष्टमंडळाला आश्वासन



**मुंबई:आरक्षण उपवर्गीकरण विरोधी संघर्ष समितीच्या शिष्टमंडळाने महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन अनुसूचित जातीतील आरक्षण उपवर्गीकरण रद्द करण्याच्या मागणीचे निवेदन सादर केले.यावेळी आनंदराज आंबेडकर,आमदार राजकुमार बडोले,माजी समाजकल्याण मंत्री व राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष बबनराव घोलप,डॉ.संदेश वाघ,तसेच इतर प्रतिनिधींच्या शिष्टमंडळ यांवेळी उपस्थित होते.**

**मुंबई:** आरक्षणाच्या उपवर्गीकरणाच्या प्रस्तावित प्रक्रियेविरोधात ३० जून २०२६ रोजी दुपारी मुंबईतील मेट्रो सिनेमा ते आझाद मैदान या मार्गावर भव्य महामोर्चाचे आयोजन करण्यात आले.हा महामोर्चा आनंदराज आंबेडकर,भीमराव आंबेडकर, माजी सामाजिक न्याय मंत्री आमदार राजकुमार बडोले आणि माजी आमदार बबनराव घोलप,बाबुराव मोने यांच्या नेतृत्वाखाली पार पडला.

आयोजकांच्या माहितीनुसार, या महामोर्चात सुमारे तीन लाख नागरिक सहभागी झाले होते. दुपारी १२ वाजता सुरू झालेला हा मोर्चा सायंकाळी ६ वाजेपर्यंत सुरू होता. मुसळधार पावसातही सहभागी नागरिकांनी मोठ्या शिस्तीने आणि उत्साहाने आपली उपस्थिती नोंदवत उपवर्गीकरणाविरोधातील भूमिका ठामपणे मांडली.

भर पावसामध्ये मोठ्या संख्येने आंबेडकरी अनुयायी आंदोलनामध्ये आले होते. सर्वोच न्यायालयाने उपवर्गीकरणाचा अधिकार राज्यांना दिल्यानंतर हा मुद्दा पुन्हा चर्चेत आला. या निर्णयाला विरोध करीत आंदोलक रस्त्यावर उतरले होते. या मोर्थ्यांच्या पार्श्वभूमीवर परिसरात पोलिस बंदोबस्त वाढविण्यात आला होता.

मोर्चाच्या समारोप सभेत अनेक मान्यवरांनी आपली मते व्यक्त केली. आमदार सिद्धार्थ खरात,ज्योतीताई गायकवाड,आमदार मेश्राम,माजी आमदार जयदेव गायकवाड, आमदार सुरेश माने,माजी आमदार बाबुराव माने,व विविध सामाजिक,राजकीय आणि बौद्ध संघटनांच्या प्रतिनिधींनी आरक्षणाच्या उपवर्गीकरणास विरोध दर्शविला.

या मोर्चात रिपब्लिकन सेनेचे अध्यक्ष आनंदराज आंबेडकर म्हणाले की, आज सगळ्या नेत्यांनी या ठिकाणी आम्हाला पाठिंबा दिला आहे. आज मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री आपल्याला सोबत आहेत.

उद्या किंवा परवा ही बैठक होईल. त्यामुळे अर्धी लढाई आपण जिंकलेलो आहोत. सरकार आश्वासन देते, पण जिल्हा जिल्ह्यात ही आंदोलने झाली पाहिजेत ५९ जाती आता शांत बसायला तयार नाहीत, आज आमच्यासोबत सगळा समाज आहे. आम्ही सांगितले की तुम्ही या ५८-५९ जालींना अंगावर घेऊ नका, हे उपवर्गीकरण आम्ही थांबवल्याशिवाय राहणार नाही. आज आंदोलनाला मोठा प्रतिसाद मिळाला आहे आणि त्याची दखल संपूर्ण विधीमंडळाने घेतली आहे. आता आपण हा लढा थांबवायचा नाही. प्रत्येक जिल्ह्यात ही आंदोलन करायचे. आपण मुंबईमध्ये एकत्रित आलात आता जिल्ह्या-जिल्ह्यामध्ये हे आंदोलन सुरु ठेवा. ही एकी टिकवण्याचे काम आपले आहे. आपल्याला आरक्षण मिळत नाही. त्यासाठी आता लढायचे आहे.

सभेला संबोधित करताना माजी सामाजिक न्याय मंत्री आमदार राजकुमार बडोले यांनी सांगितले की, अनुसूचित जाती प्रवर्गातील २७ आमदारांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांना उपवर्गीकरणास विरोध करणारे निवेदन सादर केले असून राज्य शासनाने या भूमिकेची गंभीर दखल घ्यावी. त्यांनी या सर्व आमदारांचे सार्वजनिकरित्या आभार मानले.

भारतीय बौध्द महासभेचे अध्यक्ष भीमराव आंबेडकर म्हणाले की, उपवर्गीकरणामुळे अनुसूचित जार्तीतील अनेक घटकांच्या शैक्षणिक, सामाजिक व रोजगाराच्या संधींवर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली. उपवर्गीकरण कोणत्याही परिस्थितीत होवू देणार नाही. त्यासाठी सरकार विरोधात आंदोलन तीव्र करण्याचे इशाराही देण्यात आला.

माजी आमदार बबनराव घोलप यांनी राष्ट्रीय चर्मकार महासंघाची उपवर्गीकरणाविरोधातील भूमिका स्पष्ट करत शासनाने सर्व घटकांच्या हिताचाविचार करून निर्णय घ्यावा, अशी मागणी केली.यावेळी डॉ. संदेश वाघ यांनी सर्वोच न्यायालयाच्या निर्णयांचा संदर्भ देत उपवर्गीकरणासाठी वस्तुनिष्ठ व परिमाणात्मक माहिती आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले, तसेच, क्रांतिवीर लहुजी साळवे आयोगाच्या शिफारशींची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर भर देण्यात यावा, असे त्यांनी सांगितले.**(पान २ वर)**

# टाळगाव चिखली प्रभाग क्र-१ मधील धर्मराज नगर परिसरा अतिवृष्टीत ब्लू-डाईस सोसायटीची सिमाभिंत फूटल्यामुळे..धर्मराजनगर कॉलनीत पावसाच्या सांडपाण्याचा महापूर...

### नैसर्गिक जलप्रवाह,नाले-ओढे होत आहेत नष्ठ..व यांच्यावर होत आहेत मोठ मोठे बांधकाम.महापलिकेच्या बांधकाम विभाग व संबधीत विभागातील अधिकारी यांचे दुर्लेक्ष...महापालिकेच्या आयुक्तांनी लक्ष घालून योग्य नियोजन करणे गरजेचे..

विविध विभागाच्या ताज्या बातम्या पहा.
www.pragatbhart.com
संपर्क मो-९८६०८७७७८९



**टाळगाव चिखली:मोठयाप्रमाणात पावसाच्या पाण्याच्या प्रवाहामुळे येथील बिल्यूडाईज सोसायटीची /कॉलनीची सिमाभिंतफूटून यापरिसरात असलेल्या साई स्पर्श,धर्मराज नगर कॉलणी नंबर १ व २ परिसरात मोठ्या प्रमाणात पावसाच्या प्रवाहाचा लोंढा तडवळे शेलारवस्ती तसेच देहू-आंळदी रोड वरिल पाणी येत होते.त्यांनंतर हे पाणी धर्मराजनगर रस्त्याच्या पलिकडे असलेल्या प्रतिदुर्गाटेकडी या वनिकरणामध्ये सोडण्यात आल्याचे पाहावयास मिळत आहे.**

**पिंपरी:-**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या श्री क्षेत्रटाळगाव चिखली प्रभाग क्रमांक १ मधील पाटील नगर येथील धर्मराज नगर परिसरात मोठ मोठया प्रमाणात बांधकाम होत आहेत.तसेच यापरिसरात रस्त्याचे व इतर कोणत्याच प्रकारचे नियोजन नसल्यामुळे व यापरिसरात अधिकृत व अनधिकृत बांधकाम वाढत असल्यामुळे व या परिसरात असलेला पुर्वीचा तळवडे शेलारवस्ती तसेच यापरिसरात असलेला नैसगिक नाला जलप्रवाह नाले-ओढे नष्ट झाले असल्यामुळे व पिंपरी चिंचवड महापालिकेचे नियोजन नसल्यामुळे या परिसरात पावसाचा व घाणसांडपाण्याचा महापूर येथे मोठया प्रमाणात झाला होता.

यापरिसरा असलेली ब्लू डाईस सोसायटीची सिमाभिंत पावसाच्या पाण्याच्या प्रवाहामुळे यापरिसरातील असलेल्या मोठ मोठ्या सोसायटयांच्या भिती फूटून पाण्याचा लोढा सोसायटी पार्कींग तसेच धर्मराज नगर परिसरात पसरल्याचे पाहावयास मिळत होता. हा पावसाचा प्रवाह दिनांक ६ ते १० जुलैपर्यत मोठया प्रमाणात होता यामुळे यापरिसरातील नागरिकांचे आरोग्य ही धोक्यात आले होते तरी काही जागृक नागरिकांनी व येथी नगरसेवकांनी व महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी पुढे येऊन योग्य मार्गकाढून मोठी जीवीत हानी नागरिकांचे होणारे होऊ दिले नाही.

यापरिसरात असलेले अरूंद रस्ते व अनियोजित कामामुळे प्रमुख रस्ते,चौक,महामार्ग आणि निवासी भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर पावसाचे पाणी साचत असल्याने नागरिकांना दरवर्षी त्रास सहन करावा लागत आहे.या पार्श्वभूमीवर व पूर्वीचे असलेले नैसर्गिक जलप्रवाह,नाले-ओढे आणि पाणी मुरण्याच्या व्यवस्थेचे संवर्धन करून पावसाळी पाणी तुंबण्याच्या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी येथील नागरिकांनी साप्ताहिक प्रगत भारत वृत्तपत्र सांगितले.

नागरिकांनी अधिक माहिती देताना सांगितले की,यापरिसरात संतपीठ असून भामाआसखेड यांचा पाणीसाठवायचा प्रकल्प आहे. पाटीलनगर परिसरात पाणी तुंबण्याची समस्या केवळ अतिवृष्टीमुळे निर्माण होत नसून नैसर्गिक जलमार्गांवरील अतिक्रमणे,वाढते कॉंक्रीटीकरण, पेव्हिंग ब्लॉकचा अतिवापर आणि अनियंत्रित शहरीकरण यामुळे ती अधिक गंभीर बनत आहे.



**डावी कडे असलेल्या छायाचित्रात टाळगाव चिखली:पावसाचया पाण्याच्या प्रवाहामुळे येथील बिल्यू डाईज सोसायटीची सिमाभिंतफूटून यापरिसरात असलेल्या साई स्पर्श,धर्मराज नगर कॉलणी नंबर १ व २ परिसरात मोठ्या प्रमाणात आल्यामुळे बांधकाम परिसरातील पत्रे व झाडे कालमडलेली होती. रस्त्यामधील चेंबर तुंबलेले होते.तसेच वनिकरणामधील मोठी झाडे वाकली होती.**

## वाघोलीगावचे सामाजिक कार्यकर्ता गणेश पाचारणे यांचे अल्पशा आजाराने निधन वाघोली येथे अंत्यसंस्कार संपन्न

### सा.प्रगत भारत वृत्तपत्रकाचे संपादक दत्तात्रय कांबळे यांचे कै.गणेश पाचारणे मेहूणे होते

विविध विभागाच्या ताज्या बातम्या पहा.
www.pragatbhart.com
संपर्क मो-९८६०८७७७८९



**कै.गणेश भगवान पाचारणे**

**वाघोली:चर्मकार समाजाचे मार्गदर्शक सामाजिक,राजकीय क्षेत्रातील सक्रिय व्यक्तिमत्व व समाजसेवक तसेच संत रोहिदास मंडळाचे मार्गदर्शक गणेश भगवान पाचारणे वाघोली नगर रोड संत रोहिदास नगर यांचे अल्पशा आजाराने वय वर्ष ४२ व्या वर्षी मोशी येथील धनश्री हॉस्पीटल येथे २८ जुन २०२६ रोजी निधन झाले. त्यांचा पार्थिवावर अंत्यसंस्कार श्रीक्षेत्र वाघोली येथील स्मशानभूमीत करण्यात आला.**

त्यांच्या मागे आई,पत्नी,दोन मुले व दोन विवाहित मुली असा परिवार आहेत.त्यांची पत्नी श्रीमती रेश्मा गणेश पाचारणे हया वाघोली गावच्या माजी ग्रामपंचायत सदस्या आहेत.कै. गणेश पाचारणे यांचा दशक्रिया विधी मंगळवार दिनांक ७ जुलै २०२६ सकाळी वाघोली गाव नगर रोड येथील श्रीक्षेत्र वाघेश्वर मंदिर येथे करण्यात आला होता. यावेळी वाघोली गावचे नगरसेवक,गामस्थ व समस्त पाचारणे परिवार यावेळी उपस्थित होता.

त्यांच्या अकाली व तरूण वयात जाण्यामुळे वाघोली परिसरात सामाजिक,राजकीय,क्षेत्रातील व गामस्थांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे.वाघोली गावच्या संत रोहिदास मंडळाच्या वतीने व साप्ताहिक प्रगत भारत वृत्तपत्र परिवार व राष्ट्रीय चर्मकार महासंघ व विविध संस्थांच्या वतीने त्यांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.साप्ताहिक प्रगत भारत वृत्तपत्रकाचे संपादक दत्तात्रय कांबळे यांचे ते मेहुणे होते.

कै.गणेश पाचारणे त्यांच्या अकाली जाण्यांमुळे परमेश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवोअशी भावपुर्ण श्रध्दांजली साप्ताहिक प्रगत भारत वृत्तपत्रकाचे संपादक दत्तात्रय कांबळे यांनी अर्पण केली.

# पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सर्व १० प्रभाग समिती सभापतीपदाची निवडणूक बिनविरोध!

विविध विभागाच्या ताज्या बातम्या पहा.
www.pragatbhart.com
संपर्क मो-९८६०८७७७८९




**पिंपरी:**-पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमधील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात महानगरपालिकेच्या सर्व १० प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक प्रक्रिया पार पडली.महापालिकेच्या प्रभाग समिती सभापती पदासाठी प्रत्येक प्रभागातून एकच उमेदवाराचा अर्ज प्राप्त झाल्याने सर्व प्रभाग समिती सभापती पदांची निवडणूक बिनविरोध पार पडली. या निवडणूक प्रक्रियेमध्ये विभागीय आयुक्त यांच्या आदेशानुसार पुणे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त(भा.प्र.से.) प्रजित नायर यांनी पीठासीन अधिकारी म्हणून कामकाज पाहिले.

निवडणूक प्रक्रियेचे नगरसचिव उल्हास जगताप,मुकेश कोळप,विशेष अधिकारी किरण गायकवाड,प्रभाग अधिकारी निवेदिता घार्गे,गोरक्षनाथ लिमण,अजिंक्य येळे,अश्विनी गायकवाड,परशुराम वाघमोडे, अतुल पाटील,पूजा दूधनाळे,डी. डी.कांबळे,संतोष कोराड तसेच नगरसचिव विभागातील अधिकारी यांनी काम पाहिले तर निवडणूक प्रक्रियेचे सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.पीठासीन अधिकारी प्रजित नायर यांनी जाहीर केलेल्या निर्णयानुसार,'अ'राजगड प्रभाग समितीच्या सभापतीपदी अर्चना करांडे,'ब'सिंहगड प्रभाग समितीच्या सभापतीपदी मंदार देशपांडे,'क' विजयदुर्ग प्रभाग समितीच्या सभापतीपदी निखिल बोऱ्हाडे,'ड'देवगिरी प्रभाग समितीच्या सभापतीपदी सविता खुळे, तर 'इ'शिवनेरी प्रभाग समितीच्या सभापतीपदी अर्चना सस्ते यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.त्याचप्रमाणे 'फ'तोरणा प्रभाग समितीच्या सभापतीपदी शिवानी नरळे,'ग' पुरंदर प्रभाग समितीच्या सभापतीपदी मनिषा पवार,'ह' प्रतापगड प्रभाग समितीच्या सभापतीपदी तृप्ती कांबळे,'ज'रायगड प्रभाग समितीच्या सभापतीपदी आरती चोंधे आणि 'ल' लोहगड प्रभाग समितीच्या सभापतीपदी रेखा देवकर यांची अधिकृत घोषणा करण्यात आली. प्रभाग सभापती पदाची निवडणूक पूर्ण संपल्यानंतर प्रभाग समिती सभापतींनी महापौर रवी लांडगे,उपमहापौर शर्मिला बाबर यांच्यासह पदाधिकारी, नगरसदस्य,नगरसदस्यांचीभेट घेतली.

# शिक्षक हे समर्पण भावनेने काम करतात महापौर रवी लांडगे:शिष्यवृत्ती परीक्षेत राज्यात प्रथम आलेल्या क्षितिजय नप्ते याचा सत्कार संपन्न

**पिंपरी:भोसरी मधील महात्मा फुले विद्यालय आणि पिंपरी चिंचवड शहरातील शासकीय अनुदानित शाळेतील शिक्षक हे समर्पण भावनेने काम करतात हे अभिमानास्पद आहे असे प्रतिपादन पिंपरी चिंचवडचे महापौर रवी लांडगे यांनी केले.**

**भोसरी येथील महात्मा फुले जागृती संस्थेच्या महात्माफुले विद्यालयातील क्षितिजय नप्ते याने इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे,त्याचा व इतर यशस्वी विद्यार्थ्यांचा आणि या विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शक शिक्षिका मंगल आहेर गावडे या सर्वांचा सत्कार महापौर रवी लांडगे यांच्या हस्ते करण्यात आला.**



यावेळी ज्येष्ठ माजी नगरसेवक व भोसरी येथील महात्मा फुले जागृती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष वसंत लोंढे, नगरसेवक विराज लांडे,सोनाली गव्हाणे,माई पठारे,संस्थेचे माजी अध्यक्ष चंद्रकांत रासकर, शिवलिंग ढवळेश्वर,दिगंबर ढोकळे, मुख्याध्यापक सुलभा चव्हाण, मोहन वाघुले, सुलोचना वसंत लोंढे, शिक्षक, यशस्वी विद्यार्थी व पालक आदी उपस्थित होते.

तत्पूर्वी गुणवंत विद्यार्थ्यांची भोसरी गावठाण परिसरातून मिरवणूक काढण्यात आली. संस्थेचे उपाध्यक्ष श्याम लोंढे,अनिल लोंढे,सोमनाथ रासकर,सचिव संतोष लोंढे, उपसचिव संदीप लोंढे,खजिनदार वृषभ रासकर,सह खजिनदार दीपक लोंढे,महेश लोंढे,हिशोब तपासणीस विजय लोंढे,सह हिशोब तपासणीस अतुल रासकर,सभासद तुषार लोंढे, संकेत लोंढे,सिद्धेश लोंढे,अमित लोंढे यांनी कार्यक्रमाच्या आयोजनात सहभाग घेतला होता.

यावेळी महापौर रवी लांडगे यांनी सांगितले की, या संस्थेचे अध्यक्ष नाना लोंढे हे आमचे गुरू आहेत. त्यांनी कामगार,उद्योग,सहकार, व्यापार,अध्यात्म,राजकीय अशा विविध क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे. आता त्यांनी शिक्षण क्षेत्रात क्रांती करायचे ठरवले आहे.

यावेळी गुणवत्ता यादीतील क्षितीजय नप्ते, वेदांत गोरडे, तनिष्का केदार, वैदिक कदम, ऋग्वेद गावडे, प्रत्यंचा गायकवाड, विणा पाटील, ध्रुव दैन, प्रज्वल काटे, वेदिका बरुरे, हर्षदा खांडेकर,वेदांत बंडगर, अमित कुलुंगे,स्वरा पामलवाड, स्वरा जगताप, ज्ञानेश लांडे, हर्षाली बावा, श्लोक गायकवाड, सार्थक सावंत, श्रेया जगताप, स्वराज शेळके, ईश्वरी टाकसाळ,युगंधरा ठाकूर आणि अनुष्का घाडगे, भावेश कोल्हे तसेच प्रतीक शिंदे(१०वी मध्ये ९५.८५ टक्के गुण) या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.प्रास्ताविक वसंत लोंढे,सूत्र संचालन शरद कर्णवर आणि आभार सुलभा चव्हाण यांनी मानले.

# एस.टी. महामंडळाच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त वल्लभनगर एस.टी. स्थानकात वृक्षारोपण; महापौर रवि लांडगे यांचा पर्यावरण संवर्धनाचा संदेश

**पिंपरी:** ''आज लावलेले प्रत्येक झाड हे उद्याच्या पिढीसाठी दिलेली अमूल्य भेट आहे. वाढते शहरीकरण आणि बदलते हवामान लक्षात घेता वृक्षसंवर्धन ही काळाची गरज आहे. प्रत्येक नागरिकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प केला,तर हरित,स्वच्छ आणि पर्यावरणपूरक पिंपरी-चिंचवड घडविण्याचे आपले स्वप्न निश्चितच साकार होईल.''तसेच त्यांनी पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी शासन,प्रशासन आणि नागरिकांनी एकत्रितपणे काम करण्याची गरज व्यक्त केली.महापौर रवि लांडगे यांनी येथे सांगितले.



पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे महापौर रवि लांडगे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एस. टी.) ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त वल्लभनगर एस.टी.स्थानक प्रांगणात वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

या उपक्रमातून पर्यावरण संवर्धन, हरित विकास आणि वृक्षसंवर्धनाचा प्रभावी संदेश देण्यात आला.यावेळी महापौर रवि लांडगे यांनी वृक्षारोपण करून उपस्थितांना पर्यावरण संरक्षणाची सामूहिक जबाबदारी अधोरेखित केली.वृक्ष लागवड ही केवळ औपचारिकता न राहता त्यांचे संगोपन आणि संवर्धनही तितकेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमास आगार व्यवस्थापक पल्लवी पाटील,स्थानक प्रमुख वैशाली कांबळे, कार्यशाळा प्रमुख राजगुरू, वाहतूक निरीक्षक कुलकर्णी, पर्यावरण जागर प्रतिष्ठानचे सचिव राजन जांभळे, अनंत तायडे तसेच एस.टी. महामंडळाचे प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी आणि पर्यावरणप्रेमी नागरिक उपस्थित होते.एस.टी. महामंडळाच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित या उपक्रमातून पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृती करत प्रत्येकाने वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धनात सक्रिय सहभाग घ्यावा, असा संदेश देण्यात आला.

# पिंपरी चिंचवड महापालिका सेवक पतसंस्थेचा ५४ वा वर्धापन दिन उत्साहात संपन्न

विविध विभागाच्या ताज्या बातम्या पहा.
www.pragatbhart.com
संपर्क मो-९८६०८७७७८९

**पिंपरी:पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवकांची सहकारी पतसंस्था मर्यादितचा ५४ वा वर्धापन दिन सोमवारी (दि.१३ जुलै २०२६) संस्थेच्या कार्यालयात उत्साहात साजरा करण्यात आला. वर्धापन दिनानिमित्त सभासदांसाठी अल्पोपहार व चहापान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.**



**पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवकांची सहकारी पतसंस्था च्या ५४ वा वर्धापन दिनानिमित्त उपस्थित महापौर रवी लांडगे यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करताना संस्थेचे अध्यक्ष शशिकांत ऊर्फ बबनराव झिंगुर्डे,चेअरमन शिवाजी येळवंडे,उपाध्यक्ष ज्ञानेश्वर शिंदे, सचिव विश्वनाथ लांडगे आदी यावेळी उपस्थित होते**

या कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला.वर्धापन दिनाचे औचित्य साधून संचालक मंडळाची विशेष सभा घेण्यात आली.तसेच आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिराचे उद्घाटन पिंपरी चिंचवडचे महापौर रवी लांडगे यांच्या हस्ते करण्यात आले.शिबिराला नागरिक आणि सभासदांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष शशिकांत ऊर्फ बबनराव झिंगुर्डे यांनी संस्थेच्या कामकाजाचा आढावा घेत सभासदांच्या हितासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली. महापौर रवीभाऊ लांडगे यांचा वर्धापन दिनानिमित्त संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाला चेअरमन शिवाजी येळवंडे,उपाध्यक्ष ज्ञानेश्वर शिंदे, सचिव विश्वनाथ लांडगे, खजिनदार अभिषेक फुगे यांच्यासह संचालक मंडळातील सनी कदम, नथा मातेरे, भास्कर फडतरे,चंद्रकांत भोईर, विजय नलावडे,अनिल लव्हन, विजय कांबळे, कृष्णा पारो, सदीप कापसे,योगेश रानवडे, विजय मुंडे, वैभव देवकर,विशाल भुजबळ, गणेश गवळी, युनुस पठाणीवाले, मनोज माठेरे,महादेव बोत्रे, दिगंबर चिंचवडे,धर्मेंद्र शिंदे,संजय कापसे,नंदकुमार इंदलकर,लाला गाडे,उमेश बांदल, मंगेश कलापुरे,विशाल बाणेकर,चंद्रशेखर गायकवाड,तुबार कसपटे,सूरज टिंगरे,दत्ता ढोरे,मदन चिंचवडे, किसान आरजे,प्रमोद अंबपकर, सुभाष ताकवले,भाऊसाहेब शेलार, किशोर आवाळा, गौतम पायाळ, गौतम भोयराव, राकेश चव्हाण तसेच माजी चेअरमन चारुशिला जोशी आणि नितीन समगीर आदी उपस्थित होते. वर्धापन दिनानिमित्त अनेक सभासदांनी पतसंस्थेला भेट देत संस्थेच्या कार्याची प्रशंसा केली. सभासदांच्या हितासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचे,पारदर्शक कारभाराचे आणि सुयोग्य कामकाजाचे यावेळी विशेष कौतुक करण्यात आले.

# भाजपच्या पिंपरी-चिंचवड मध्यवर्ती कार्यालय प्रभारीपदी मधुकर बच्चे यांची नियुक्ती

विविध विभागाच्या ताज्या बातम्या पहा.
www.pragatbhart.com
संपर्क मो-९८६०८७७७८९

**पिंपरी:-भारतीय जनता पार्टी पिंपरी-चिंचवड शहर जिल्ह्याचे महामंत्री मधुकर बच्चे यांची पक्षाच्या मध्यवर्ती कार्यालय प्रभारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे.**




भाजप शहराध्यक्ष तथा नगर-सेवक शत्रुघ्न (बापू) काटे यांनी पक्षाच्या मध्यवर्ती कार्यालयात आयोजित कार्यक्रमात त्यांच्या नियुक्तीची घोषणा केली.मधुकर बच्चे हे पक्ष संघटन आणि कार्यकर्त्यांशी सातत्याने संपर्क ठेवणारे सक्रिय पदाधिकारी म्हणून ओळखले जातात.त्यांच्या नियुक्तीमुळे पक्षाचे प्रशासकीय व संघटनात्मक कामकाज अधिक प्रभावीपणे राबविले जाईल, असा विश्वास पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.यावेळी भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष सदाशिव खाडे, सरचिटणीस मोरेश्वर शेडगे,विकास डोळस, महिला मोर्चा अध्यक्षा सुजाता पालांडे,युवा मोर्चा अध्यक्ष दिनेश यादव, माजी नगरसेवक राजू दुर्गे,कार्यालय प्रमुख संजय परळीकर यांच्यासह मनोज ब्राह्मणकर, विशाल वाळुंजकर, अजय पाताडे,संतोष तापकीर,प्रदीप बेंद्रे,जोशना कलाटे, मनीष पंजाबी, हर्षदा मोरे,राजश्री शहा तसेच पक्षाचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

नियुक्तीबद्दल मधुकर बच्चे यांचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी अभिनंदन करत त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# श्री शंभूराज्याभिषेक ट्रस्टच्या वतीने आयोजित उद्योजक संतोषशेठ बारणे यांना 'शिवगौरव गाथा'पुरस्कार प्रदान

विविध विभागाच्या ताज्या बातम्या पहा.
www.pragatbhart.com
संपर्क मो-९८६०८७७७८९

**पुणे:**शिवगौरव गाथा पुरस्कार सोहळा लाल महाल, कसबा पेठ, पुणे येथे नुकताच संपन्न झाला. आयोजितयावेळी 'शिवगौरव गाथा पुरस्कार' सोहळ्यात राजस्थ-ानचे महामहिम राज्यपाल हरिभाऊ (नाना)बागडे यांच्या प्रमुख उपस्थितीत अनेक मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.या कार्यक्रमास उपस्थित राहण्याची तसेच प्रमुख व सन्माननीय अतिथी म्हणून सामाजिक व बांधकाम क्षेत्रामधील प्रसिध्द व्यावसायिक संतोष बारणे यांचा सहभागी होण्याची संधी मिळाली.




शिवशंभो राज्याभिषेक ट्रस्टचे अध्यक्ष शेखरभाऊ पाटील आणि संपूर्ण आयोजक मंडळाचे यावेळी संतोषशेठ बारणे यांनी मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

त्यांना प्रत्यक्ष भेटण्याची संधी मिळाल्याबद्दल मी स्वतःला भाग्यवान समजतो आणि त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो.या सोहळ्यात शिवगौरव गाथा पुरस्काराने सन्मानित झालेल्या सर्व मान्यवरांचे मनःपूर्वक अभिनंदन. आपण आपल्या सामाजिक, सांस्कृतिक आणि राष्ट्रहिताच्या कार्यातून छत्रपती शिवाजी महाराज व धर्मवीर संभाजी महाराज यांचे विचार समाजात अधिक प्रभावीपणे रुजवत राहाल,हीच सदिच्छा.पुन्हा एकदा शिवशंभो राज्याभिषेक ट्रस्ट, सर्व आयोजक, उपस्थित मान्यवर आणि सन्मानित व्यक्तींचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो.

